आदरांजली

बस एक एहसास की खामोशी गुंजती है! - मीनाकुमारी



महान अभिनेत्री मीनाकुमारीला आपण विसरू म्हटले तरी विसरता येणार नाही. मीनाकुमारी गेली आणि अभिनयाची एक शैलीच संपली. मीनाकुमारीच्या आयुष्यातील शेवटच्या काळात गीतकार-दिग्दर्शक-निर्माते गुलजार तिच्या अगदी जवळ होते. काही मंडळी तर असंही सांगतात की, मीनाजींनी आपल्या सुमारे अडीचशे डायऱ्या गुलजारसाहेबांना सोपवलेल्या. त्यातील काही खास नग्म, गझला, पंक्ती आणि शेरो शायरी निवडून गुलजारनी 'मीनाकुमारी की शायरी' नावाचे पुस्तकही संपादित केलेले. गुलजार यांच्या त्याच पुस्तकातील काही अंश मीनाकुमारी यांच्या ३१ मार्च रोजी असणाऱ्या पुण्यतिथीनिमित्त...

□ संकलन: विजय अकेला

'मी' या 'मी'चे मला खूप भय वाटते.

शायरी मीनाजींची तर 'मी' कोण?

मीनाजींच्या मृत्युपत्रात वाचले की, त्यांच्या रचना त्यांच्या डायरीचे सर्वाधिकार त्यांनी मला सोपवलेत. खरं तर त्या लिखाणावर त्यांचातरी अधिकार कुठे होता? शायराचा त्याच्या कृतीवर तोवरच अधिकार असतो जोवर ती कृती प्रसवते. नंतर त्यावर चाहत्यांचा अधिकार असतो.

आणि त्या चाहत्यांच्या अधिकाराचा भार त्या माझ्यावर सोपवून गेल्या.

एक एहसास-मीनाकुमारी
न हाथ थाम सके, न पकड सके दामन
बडे करीब से उठकर चला गया कोई
मीनाजी निघून गेल्या...
राह देखा करेगा सदियों तक
छोड जायेंगे यह जहां तनहा

जाताजाता अख्ख्या जगाला त्या पोरकं करून गेल्या. एका अख्ख्या काळाचा अधिभार स्वत:बरोबर घेऊन गेल्या. जोवर त्या जगल्या तोवर पूर्णपणे आयुष्याचा उपभोग घेऊन जगल्या. सुखदु:ख भोगीत जगल्या. दुसऱ्यांचे दु:ख झेलीत गेल्या.

टुकडे टुकडे दिन बीता
धज्जी धज्जी रात मिली।
जिसका जितना आँचल था
उतनी ही सौगात मिली॥
जब चाहा दिल को समझें
हंसने की आवाज सुनी।
जैसे कोई कहेता हो, लो
फिर तुमको अब मात मिली॥
बातें कैसी? घातें क्या?
चलते रहना आठ पहर।
दिल-सा साथी जब पाया
बेचैनी भी साथ मिली॥

त्यांचं हृदय अगदी विशाल होतं, समुद्रासारखं; त्यातही ते दु:ख सामावेना तेव्हा त्यांचा नाईलाज झाला. तो भार सहन झाला नाही. एकदा त्यांनी आपलं व्यक्तिचित्र नग्मच्या रूपात लिहिलेलं.

शहतूत की शाख पे बैठी है मीना
बुनती है रेशम के धागे
लम्हा-लम्हा खोल रही है
पत्ता-पत्ता बीन रही है
एक-एक सांस बजाकर सुनती है
सौदापन
एक-एक सांस को खोल के, अपने तन पर लिपटाती जाती है
अपने ही तागों की कैदी
रेशम की यह शायर इक दिन
अपने ही तागों में घूटकर मर जायेगी।

हे वाचून मी हसलो. मला जखडून टाकणाऱ्या त्या पंक्ती आज कुठेतरी हरवल्यागत वाटतात. मी प्रेमावरच प्रेम करतो. प्रेमाच्या अनुभूतीवर प्रेम करते. एवढं प्रेम कुणी आपल्या शरीरावर लपेटून घेतलं तर आणखी काय हवं?

प्यार सोया था, प्यार ढूंढा था
ठंडी ठंडी-सी हसरतें ढूंढी
सोंधी सोंधी रूह की मिट्टी
तपते, नोकीले, नंगे रस्तों पर
नंगे पैरो ने दौडकर, थमकर
धूम में सेंकी छाँव की चोटें
छाँव में देखे धूप के छाले

एक नग्म, एक गझल - मीनाकुमारी



अपने अंदर महक रहा था प्यार-
खुद से बाहर तलाश करते थे

अंतर्मनातून बाह्यमनापर्यंतची एक लांबलचक यात्रा पूर्ण करण्यासाठी मीनाकुमारीने एक संपूर्ण जीवन खर्चले. या यात्रेत अनेक टप्पे त्यांनी पार केले.

आबलापा कोई दस्त में आया होगा
वर्ना आँधी में दिया किसने जलाया होगा?
जर्रे-जर्रें में जडे होंगे कुंआरे सिजदे
एक-एक बुत को खुद उसने बनाया होगा
मिल गया होगा अगर कोई सुनहरा पत्थर
अपना टूटा हुआ दिल याद तो आया होगा

या यात्रेत सोलवटलेल्या पायांनी चालणे त्यांच्या अंगवळणी पडलेले.

प्यास जलते हुए कांटो की बुझाई होगी,
रिसते पानी को हथेली पे संजाया होगा

खरं सांगायचं तर एक मोठेच जीवन त्या जगल्या. क्षणाक्षणाने

जगल्या. एखाद्या क्षणी उदासीनता वाटली तर त्या तिथून पळाल्या नाहीत. त्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी स्वत:ला खोटे समजावण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. उलट त्या क्षणी त्यांनी ती वेदना कवटाळली नि मनसोक्त त्या रडल्या.

हसल्या तेव्हा अशा मनमोकळ्या हसल्या की एखादा दिवस प्रसन्न प्रसन्न व्हावा.


प्रत्येक दिवसाची सुरूवात अशी असायची...

आगाज तो होता है
अंजाम नहीं होता,
जब मेरी कहानी में
वह नाम नहीं होता.
जब जुल्फ की कालिख में
गुम हो जाये कोई राही
बदनाम सही लेकिन
गुमनाम नहीं होता.
हंस-हंस के जवाँ दिल के
हम क्यों न चुने टुकडे?
हम शख्स की किस्मत में
इनाम नहीं होता.

कित्येक छबी त्यांच्या डोळ्यात तरळत होत्या. एक पांढरे रण, काळ्या जळावर झुकलेला गुलमोहर वृक्ष, एका धुंद नदीत डुबलेली नाव, कधी स्वप्नात त्यांना चेहरा दिसला तेव्हा त्यांनी लिहिले...

दिन डुबे है, या डूबी
बारात लिये कश्ती,
साहिल पे मगर कोई
कोहराम नहीं होता.

मीनाकुमारीने आपल्या गझला गीतकार गुलजारांकडे सोपवलाय.



एक एकटी मीना आणि तिच्या एकट्या व्यक्तिमत्त्वात इतर कितीतरी चेहरे. ज्या भूमिका ती चित्रपटात जगली त्यांचा चेहराही तिने कायमचा स्वत:वर चिकटवून घेतला. चित्रपट पूर्ण झाले. पडद्यावर झळकूनही गेले. पण मीनाकुमारी मात्र त्या भूमिकांमध्येच गढून राह्यली. बीवी, साहबजान, दीदी, मंजू, जानम, महजबीं... म्हणूनच बऱ्याचदा

मीना बसल्याबसल्या आपल्या चेहऱ्यांशी बोलू लागली...

यों भी, कभी-कभी तो
नजारा करेंगे हम.
पहना करो नकाब,
उतारा करेंगे हम.
महताब की जबीं पे
पसीने को देखना
जब 'महजबीन' तुमको
पुकारा करेंगे हम
महताब की जबीं पे
पसीने को देखना
जब नाम लेके तुमको
पुकारा करेंगे हम.
हमसे इबादतों में
कभी रह गई अगर
रह-रहके अपने माथे पे
मारा करेंगे हम.
मंजिल से मिल सका न
हमें गर कोई जवाब
मुड-मुड के फिर से, तुझको
पुकारा करेंगे हम.
वक्ते सहर जो रात की
लौ झिलमिला गई
उठकर तुम्हारी जुल्फ
संवारा करेंगे हम.

चेहऱ्यांवरचे दांभिक मुखवटे उतरवण्याबरोबरच जीवन कशाला म्हणायचे त्याचाही शोध ती घेते.

चांद तनहा है, आस्मां तनहा
दिल मिला है कहाँ-कहाँ तनहा.
बूझ गई आस, छूप गया तारा
थरथराता रहा धूआँ तन्हा.
जिंदगी क्या इसी को कहेते हैं?
जिस्म तनहा है जां तन्हा.
हमसफर कोई मिल गया जो कहीं
दोनों चलते रहें तन्हा-तन्हा.
राह देखा करेगा सदियों तक
छोड जायेंगे यह जहां तन्हा.

जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला तरी तो अर्थ सापडला नाही. हातात काहीही आले नाही मात्र आठवणी तेवढ्याच बाकी राह्यल्या.

गिरा दो पर्दा की दास्तां खाली हो गई है
गिरा दो पर्दा की खूबसूरत उदास चेहरा
कहीं खयालों में खो गया है
गरीब आँखो से रूठकर
एक-एक आँसू उतर गया है
आवाजें अपने सूरों से उठकर चली गई हैं
बस, एक एहसास की खामोशी है, गुंजती है
बस, एक तकमील का अंधेरा है, जल रहा है

– गुलजार